३३) गर्गे स. मा. – करवीर रियासतीची कागदपत्रे, खंड १, पृ. १२६.

३४) के. के. मुकेशवाणी केंट डब्लू. विंग्ज. –मराठा मिन्स्ट ॲन्ड कॉईनस्, पृ. ८१

३५) मोडक बा. प्र. – कोलापूर आणि कर्नाटक प्रांतातील राज्ये व संस्थाने यांचा इलिहास, पूर्वाध भाग, पृ. ६७.

३६) गर्गे स. मा. – करवीर रियासत, पृ. ३१९.

३७) कित्ता – पृ. ३४० – ३४२.

३८) कित्ता – पृ. ३४३.

३९) ग्रॅहम डी. सी. – स्टॅटिस्टिकल रिपोर्ट ऑन द प्रिंसीपॉलीटी ऑफ कोल्हापूर, पृ. ५४४.

४०) गर्गे स. मा. – उपरोक्त, पृ. ५३७ – ५३८.

४१) मोडक बा. प्र. – कोल्हापूर राज्याचा इतिहास, पृ. ९.

४२) गर्गे स. मा. – करवीर रियासत, पृ. ५३८.

४३) मोडक बा. प्र. – उपरोक्त, पृ.

४४) गुजर मा. वि. – करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने, भाग ७, ले ७.

४५) गर्गे स. मा. – उपरोक्त, पृ. ५५२.

४६) चौधरी की. का. – कोल्हापूर जिल्हा गॅझेटियर, पृ. ६८२.

# प्रकरण – पाचवे

## उपसंहार

## प्रकरण – पाचवे

# उपसंहार

प्राचीन आणि मध्ययुगीन काळात संरक्षणाच्या दृष्टीने किल्ल्यांना महत्वपूर्ण स्थान होते. मध्ययुगीन काळात किल्ल्यांचा उपयोग संरक्षणाबरोबर किल्ल्यांच्या आसपासच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवण्यास केला जात असे. किल्ल्यांचे वेगवेगळे प्रकार असले तरी डोंगरी किल्ल्यांना संरक्षणाच्या दृष्टीने महत्वपूर्ण स्थान होते. अशाच किल्ल्यापैकी दक्षिण महाराष्ट्रातील महत्वपूर्ण किल्ला म्हणजे 'पन्हाळगड' होय.

पन्हाळगडा संबंधीत वेगवेगळे शिलालेख, वेगवेगळी कागदपत्रे, नकाशे, प्राथमिक साधने, दुय्यम साधने उपलब्ध असताना ही हा गड दुर्लक्षित राहिला होता. म्हणून या किल्ल्यावर ज्या महत्वाच्या घडामोडी घडून आल्या त्याचा आढावा घेण्याचा एक प्रयत्न आहे.

असा हा पन्हाळगड कोल्हापूर प्रांतात येतो. प्राचीन काळापासून कोल्हापूर परिसराला धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय महत्व आहे. कोल्हापूर शहर हे सहयाद्रीची पूर्वेकडील मावळच्या पट्टयात पंचगंगेचे काठी वसलेले आहे. पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेश आणि पूर्वेकडील मैदानी प्रदेश या दरम्यान कोल्हापूरचे स्थान आहे.

कोल्हापूर प्रांत हा नैसर्गिक संरक्षण प्राप्त झालेला प्रदेश असून या भागात अनेक शिखरे व खिंडी आढळतात. डोंगराचे सपाट प्रदेश व खोलदऱ्या ही या भागाची प्रमुख वैशिष्टे होत. त्यामुळे हा प्रदेश किल्ले बांधण्यास संरक्षणाच्या दृष्टीने योग्य होता. म्हणूनच या प्रदेशात अनेक किल्ले बांधले गेले. यात विशाळगड, प्रचीतगड, पन्हाळा, पावनगड, रांगणा, गंधर्वगड, मनोहरगड व महादेवगड इत्यादी.

पन्हाळगडाची बांधणी ही संरक्षणाच्या दृष्टीने अभेद्य होती. पन्हाळगडाची तटबंदी ही संरक्षणाच्या दृष्टीने अतिशय मजबूत बांधण्यात आली होती. दरवाजे व माऱ्याच्या टापूत येणाऱ्या ठिकाणी ही तटबंदी १५ फूट रुंदीची ठेवण्यात आली आहे. पन्हाळगडाची तटबंदी काही ठिकाणी नैसर्गिक तर काही ठिकाणी १५ ते ३० फूट

उंचीची दगडांनी बांधलेली तटबंदी आहे. त्यामुळे शत्रूला तो सहजासहजी जिंकता येणे शक्य नव्हते.

दक्षिण महाराष्ट्रात पन्हाळगड या किल्ल्याला महत्वाचे स्थान होते. पन्हाळगडाच्या पूर्वेला विजापूर, गोवळकोंडा आणि पश्चिमेला कोकणचा किनारा यावर नियंत्रण ठेवण्यास हे मुख्य ठिकाण होते. तसेच कोकणातून येणाऱ्या अणुस्कुरा, बावडा, आंबा, काजिर्डा या घाटमार्गावरच नियंत्रण ठेवण्यासाठी उपयोगात आणला जात असे.

पन्हाळगड हा वेगवेगळया राजवटीच्या ताब्यात गेल्यावर या गडाची नावे बदलत गेल्याचे संदर्भ वेगवेगळया शिलालेखातून व कागदपत्रांतून मिळतात. पण सध्या तो 'पन्हाळा' या नावानेच ओळखला जातो.

पन्हाळगडाची बांधणी नेमकी कुणी केली असावी याचा निष्कर्ष काढता येत नाही. पण शिलाहार राजवटीतील भोज दुसरा याने पन्हाळगडाची संरक्षणाच्या दृष्टीने चांगली मजबुती केली व आपल्या राज्याची राजधानी म्हणून पन्हाळगडाची निवड केली.[१] त्यामुळे शिलाहारांच्या राजवटीत पन्हाळगडाला महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले होते.

अदिलशहाच्या काळात पन्हाळगड ही त्याच्या राज्याची उपराजधानी राहिली होती. हे पन्हाळगडावरील शिलालेखातून समजते. पहिला इब्राहीम अदिलशहा व दुसरा इब्राहीम अदिलशहा यांनी पन्हाळगडावर विशेष लक्ष केंद्रीत केले होते. त्यांच्या काळात पन्हाळगडावर ईदगाह, दर्गा, तटबंदी इत्यादी वास्तू बांधण्यात आल्या. तसेच पन्हाळयाचा सुभा हा जिल्हयाचे ठिकाण बनले होते. व पन्हाळयाच्या सुभ्यात नऊ तालुक्यांचा समावेश करण्यात आला होता. यावरुन त्यांनी पन्हाळगडाचा राज्यकारभारात चांगला उपयोग करुन घेतला होता.

मराठयांच्या राजवटीत किल्ल्यांना महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले होते. शिवरायांची राज्यकारभाराची मुख्य भिस्त ही किल्ल्यावरच अवलंबून होती. शिवाजीराजांनी दक्षिणेकडील य महत्वपूर्ण गडाचा ताबा इ. स. १६५९ मध्ये प्रथम मिळवला.

यानंतर या प्रदेशावर अधूनमधून विजापूकरांचा अंमल राहिला तरी प्रामुख्याने पन्हाळगडावर मराठयांची सत्ता तीनशे वर्षे राहिली. इ. स. १६६० चा सिद्दी जौहरचा वेढा तर शिवशाहीतील महत्वाचा प्रसंग होय. या लढाईच्या वेळी प्रथम इंग्रजासारख्या परकीय सत्तेबरोबर महाराजांचे संबंध आले. यावेळी इंग्रजी तोफा सारख्या तोफा फ्रेंच, पोर्तुगीज या सारख्या परकीय सत्ताकडून मिळवणे महाराजांना गरजेचे वाटू लागले. कारण पन्हाळयासारख्या भक्कम किल्ल्या अशा तोफामुळे असुरक्षित होऊ शकते हे त्यांच्या लक्षात आले.

शिवाजीराजांना रायगडापेक्षा काही गोष्टीत बाहय प्रदेशाशी संबंध ठेवण्यास पन्हाळगड जास्त उपयुक्त होता. अदिलशाहीच्या व कर्नाटक प्रांताच्या आसपासच्या भागात राजकारभारासाठी उपयुक्त होता. म्हणूनच छ. शिवाजी राजापासून ताराबाई पर्यंत पन्हाळा हीच एका अर्थाने छत्रपतीची राजधानी होती. शिवाजी महाराजांनी पन्हाळयाला सुभ्याचे ठिकाण केले व त्याच्या अंमलाखाली दहा तालुके नेमून दिले. यावरुन शिवकाळात पन्हाळगडाला किती महत्व दिले जात होते हे समजते.

इ. स. १६७३ मध्ये शिवाजीराजांनी पन्हाळगड हा प्रतापराव व आनंदराव या दोन सरदारामार्फत विजापूरच्या अदिलशहाकडून परत मिळविला. या प्रस्तूत स्वारीचे समग्र वर्णन 'जयराम पिंडये' या कवीने त्याच्या 'पर्णालपर्वतग्रहणाख्यान' या संस्कृत ग्रंथात केले आहे.

'जयराम पिंडये' हा शहाजी महाराजांच्या दरबारातील अनेक कवीपैकी प्रसिध्द असा कवी होता. त्याने अनेक आख्यानकाव्ये शहाजी, शिवाजी व व्यंकोजी यांना ऐकवली होती. छ. शिवाजीराजांनी पन्हाळगड कसा हस्तगत केला हे व्यंकोजीला जयराम कवीने ऐकवलेले आख्यानकाव्य आहे. त्याच्या आख्यानात आंलकारीक शब्दप्रयोग, उपमा, उत्प्रेक्षा यांनी त्याची वाणी नटली आहे. पण तरीही हे आख्यानकाव्य समकालीन असल्याने हे एक महत्वाचे प्राथमिक साधन आहे.

छ. संभाजीराजांचे वास्तव्य हे पन्हाळगडाला इ. स. १६७२–७३ पासूनच लाभले होते. संभाजीराजांच्या आयुष्यातील अनेक घटना या पन्हाळगडाच्या साक्षीने घडल्या होत्या. संभाजीराजे सिंहासनारुढ झाले तेंव्हा मराठी राज्याचा भौगोलिक विस्तार मोठा

होता. पण फौजेच्या विस्तारास रायगडापेक्षा पन्हाळगडाचा उपयोग अधिक होई. कोकणातून घाटमाथ्यावर व दक्षिणेतून कोल्हापूर मार्गे येणाऱ्या शत्रूवर नजर ठेवणे, पायबंद घालणे या दृष्टीने पन्हाळगड हे मध्यवर्ती ठिकाण मानले गेले.

छ. संभाजी महाराज चरित्राबद्दल अनेक प्रवाद आहेत. त्यापैकी एक प्रकरण म्हणजे थोरातांची कमळा होय. पन्हाळगडाच्या पायथ्याशी आपटी नावाचे गाव आहे. त्याठिकाणी एक वास्तू मंदिर आहे. हे थोरातांच्या कमळेचे म्हणून दाखविले जाते. पण प्रत्यक्षात हे समाधी मंदिर थोरात घराण्यातील यशवंतराव थोरात व त्यांची पत्नी गोडाबाई हिचे आहे.[२]

इ. स. १७०१–०२ च्या सुमारास औरंगजेब बादशहाने पन्हाळगडाचा ताबा मिळविण्यासाठी निकराचे प्रयत्न केले होते. पण अनेक प्रत्यन करुनही त्याला हा किल्ला महाराणी ताराबाईकडून त्यांना मिळवता आला नाही, म्हणून त्यांनी ५५ हजार रुपयांना हा किल्ला विकत घेतला.[३]

राजाराम महाराजांची पत्नी महाराणी ताराबाई हिच्या काळात पन्हाळगडाला महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले. कारण ताराबाई व शाहू महाराज यांच्या संघर्षात ताराबाई ने कोल्हापूर राज्याच्या गादीची स्थापना इ. स. १७१० मध्ये पन्हाळगडावर केली. त्यामुळे पन्हाळगडास कोल्हापूर राज्याची राजधानी होण्याचा मान मिळाला. पुढे इ. स. १७१४ मध्ये पन्हाळगडावर जी रक्तशून्य राज्यक्रांती घडून आली. त्यामागे ताराबाईच्या जुलमी वर्तना बरोबरच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रामचंद्र पंताचा सहभाग असावा असा निष्कर्ष काढता येतो. या सत्तांतराने ताराबाई व त्यांचे पुत्र शिवाजीराजे यांना पन्हाळगडावर कैदेत राहावे लागले व कैदेत असतानाच रामराजे यांचा जन्म पन्हाळगडावर जाहला. व पुढे हेच रामराजे सातारचे छत्रपती बनले.

या पुढील काळात पन्हाळगडाला खूपच महत्व आले. जिजाबाईच्या काळात पन्हाळगडावरील देवीला जिवंत मनुष्य देण्याच्या प्रथेचा उल्लेख मोडक यांनी केला आहे. पण यास याशिवाय आणखी काही ही संदर्भ मिळत नाहीत. जिजाबाईच्या काळात पन्हाळगडावर संभाजी महाराजांचे मंदिर बांधले गेले.[४]

संरक्षणाच्या दृष्टीने पन्हाळगडाला या काळात फार महत्व होते. इ. स. १७७७ मध्ये महादजी शिंदेची कोल्हापूरवर स्वारी झाली तेंव्हा करवीर छ. शिवाजी दुसरे यांनी सुरक्षितेतच्या दृष्टीने पन्हाळगडाचा आश्रय घेतला होता.

इ. स. १७८८ मध्ये पन्हाळगडाची राजधानी करवीरी आणण्यात आली. कारण, कामगारांना प्रत्येकवेळी करवीरी जाणे–येणे त्रासाचे होते, तसेच या प्रदेशात पावसाचे प्रमाण जास्त असल्याने वाहतुकीस अडथळे निर्माण होत. म्हणून राजधानी पन्हाळयाहुन करवीरी आणण्यात आली. पण तरी ही पन्हाळगडाचे महत्व कमी झाले नाही. कारण कोल्हापूरवर शत्रूचे आक्रमण झाल्यास कोल्हापूरहून पन्हाळाजवळ असल्याने पन्हाळयास जाणे सोपे होते. त्याचप्रमाणे पन्हाळगड संरक्षणाच्या दृष्टीने अभेद्य होता. शत्रूला हा किल्ला मिळवणे सहजासहजी शक्य नव्हते. व पुढील काळात पन्हाळगड थंड हवेचे व पर्यटनाचे ठिकाण म्हणून विकसित होत गेले. कोल्हापूर शहर जरी राजधानी बनले तरी संकटकाळी संरक्षणार्थ पन्हाळगडाचे महत्व कायम राहिले.

छ. संभाजीराजे दुसरे यांनी इ. स. १८१५ मध्ये पन्हाळा येथे टंकसाळ सुरु केली.[१] व त्याच्यावर शंभूराजांचा शिक्का पाडण्यात आला.

छ. संभाजी दुसरे यांच्या काळात इ. स. १८२९ मध्ये इंग्रज सत्तेबरोबर झालेल्या तहाने पन्हाळगड व पावनगड येथे इंग्रजी सत्तेच्या फौजा ठेवण्यास मान्यता देण्यात आली.

इंग्रजांनी कोल्हापूर राज्यावर सर्व बाजूनी निर्बंध ठेवण्यास सुरुवात केली. पुढे कोल्हापूरचे कारभारी म्हणून दाजी कृष्ण पंडित यांची नेमणूक करण्यात आली. त्यांनी नव्या शासकीय सुधारणा अंमलात आणल्या त्या पूर्वीपेक्षा वेगळया स्वरुपाच्या होत्या. यातून ब्रिटीश सत्तेविरोधी प्रक्षोभ वाढत गेला. यातून इ. स. १८४४ मध्ये भुदरगड, सामानगड, पन्हाळगड व कोल्हापूर शहर इत्यादी भागात इंग्रजी सत्तेविरोधी उठाव घडून आले. या उठावाची सुरुवात भुदरगड येथे २२ जुलै १८४४ रोजी झाली. या उठावाचे लोण पन्हाळगडाला ही पोहचले. पन्हाळा हा मूळचा मजबूत असल्याने या किल्यावर गडकऱ्यांनी उठाव जर मोठा केला ते यशस्वी होऊ शकतील हे इंग्रजांनी ओळखले होते. म्हणून हा उठाव दडपून टाकण्यासाठी सर्व किल्ल्याप्रमाणेच

पन्हाळगडावर ही तोफाचा भडिमार केला. यात पन्हाळगडाचा चार दरवाजा पाडून टाकण्यात आला. तसेच पन्हाळगडाची तटबंदी ही बऱ्याच ठिकाणी पाडण्यात आली. व अशा प्रकारे सर्व ठिकाणचा उठाव ब्रिटीशांनी मोडून काढला व हा उठाव अयशस्वी झाला. कारण, योग्य नेतृत्वाचा अभाव, उठावात सुसूत्रता नव्हती, विस्कळीतपणा, फूटीरपणा, फितुरी इत्यादी कारणांनी या उठावास एकजिनसीपणा व संघटीतपणा लाभला नाही.

गडकरी व अडचशे लोकांवर बंडात भाग घेतल्याचा आरोप सिध्द होऊन, त्यांना शिक्षा देण्यात आल्या. बाबासाहेब महाराज अल्पवयीन असल्याने त्याच्यावर बंडात सामील असल्याचा आरोप करता येत नव्हता. महाराजांचे मानमराबत चालू ठेवण्यात आले. पण प्रत्यक्ष सत्ता मात्र पोलिटिकल सुपरिटेंडेटच्या हाती देण्यात आली. नव्या व्यवस्थेप्रमाणे कोल्हापूरचा पहिला सुपरिटेंडेट म्हणून इ. स. १८४५ मध्ये 'मेजर ग्रॅहमची' नियुक्ती करण्यात आली. यानंतर पन्हाळगडावर इंग्रजांचे वर्चस्व राहिले, गडाच्या रक्षणासाठी थोडीशी शिबंदी आणि शंभर तोफा ठेवण्यात आल्या.

इ. स. १९४९ मध्ये कोल्हापूर संस्थान हे स्वतंत्र्य भारतात विलिन झाले. त्यानंतर पन्हाळगड हे दक्षिण महाराष्ट्रातील महत्वपूर्ण पर्यटनाचे ठिकाण म्हणून विकसीत होत गेले. पर्यटकांना महाराष्ट्र शासनाने अनेक सोयी सुविधा या पुरविल्या आहेत. त्यामुळे अनेक पर्यटक हे पन्हाळगडाला भेट देत असतात. पन्हाळगडावर पाहण्यासारख्या अनेक वास्तू आहेत. यात पन्हाळगडावरील दरवाजे, इमारती, मंदिरे व अन्य इतर वास्तू पाहण्यात पर्यटक येत असतात.

सध्याच्या परिस्थितीत पन्हाळगडावरील अनेक वास्तू या नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे या ऐतिहासिक वास्तूचे जतन करणे ही शासनाची जबाबदारी आहे. तसेच या वास्तूचे सौंदर्य टिकवण्यासाठी जनतेचे ही सहकार्य आवश्यक आहे. 'पर्यटन' हा घटक पन्हाळयाच्या व पर्यायाने कोल्हापूर जिल्हयाच्या आर्थिक विकासाचा भाग बनलेला आहे. शिवकाळात राजकीयदृष्टया महत्वाचा असलेला किल्ला आता पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा ठरु लागला आहे.

## संदर्भग्रंथ सूची :–

१ बा. प्र. मोडक. – कोलापूर आणि कर्नाटक प्रांतातील राज्येच संस्थाने यांचा इतिहास, पूर्वाध भाग, पृ. १७६.

२ डॉ. पवार ज. – छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ, पृ. ३०६–३०९.

३ डॉ. राव व्ही. डी. (Edit.) – स्टडीज इन इंडियन हिस्ट्री, पृ. १८८–१८६.

४ डॉ. पवार अप्पासाहेब. – जिजाबाईकालीन कागदपत्रे, पृ. ३२१.

५ गर्गे स. मा. – करवीर रियासतीची कागदपत्रे, खंड १, पृ. १२६.